अहवाल

**मराठी विभाग आयोजित**

**" वर्तमान मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती " या विषयावरील**

**एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र**

**दि. २५ फेब्रुवारी २०१९**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित व अजंठा एज्युकेशन अॅण्ड मिलिटरी प्रिपरेटरी इन्स्टिटयूट संचलित, इंद्रराज कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड जि. औरंगाबाद मराठी विभागाच्या वतीने " वर्तमान मराठी भाषा, साहित्य आाणि संस्कृती " या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

या चर्चासत्राचे उदघाटन सकाळी 10:00 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद कलाशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय सोळंके यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार श्री. उत्तमसिंह पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. विचारपीठावर संस्थेचे सचिव अॅड. श्री. जे. आर. देवरे , प्रमुख अतिथी प्रा.डॉ.पी. विठ्ठल, प्राचार्य डॉ. प्रमोद शर्मा , व्यंकटेश लांब व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

जागतिकीकरणाच्या आगमनाने सगळीच क्षेत्रे प्रभावित झाली असून भाषा, साहित्य, आणि संस्कृतीही त्यापासून अलिप्त राहिलेली नाही. भाषा ही केवळ भाषा नसते, तर ती पिढयानपिढया चालत आलेल्या संस्कृतीचा भाग असते , ती जतन करणं हे प्रत्येक भाषकांच आद्यकर्तव्य असल्याची भावना उदघाटकीय भाषणात डॉ. संजय सोळंके यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात श्री.उत्तमसिंह पवार यांनी जागतिक पातळीवरील भाषांचा उल्लेख करत मराठी भाषेची सकस परंपरा अधोरेखित करुन चर्चासत्रास शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी प्राचार्य डॉ. प्रमोद शर्मा यांनी मनोगत व्यक्त करुन महाविद्यालयाचा परिचय करुन दिला. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिरुध्द मोरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.मनीषा मुगळीकर यांनी तर आभार प्रा.रमेश मेंढे यांनी व्यक्त केले .

उदघाटन सत्रानंतर 'वर्तमान मराठी भाषा,साहित्य आणि संस्कृती' या विषयाच्या अनुषंगाने बीजभाषक म्हणून स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील मराठी भाषासंकुलातील अभ्यासक प्रा.डॉ. पी. विठ्ठल, तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव अॅड. जे.आर.देवरे उपस्थित होते.वर्तमान मराठी भाषा आणि बोलीभाषा यांचा विस्तृत आढावा घेऊन संस्कृती,भाषा आणि साहित्य यांचे समाज जीवनातील स्थान अधोरेखित करुन, मराठी भाषेची वर्तमान स्थितिगती यावर डॉ. पी. विठ्ठल यांनी भाष्य केले . एकीकडे ज्ञान तंत्रज्ञान यांची भाषा झाल्यामुळे इंग्रजी भाषा प्रभावी ठरली व जागतिक पटलावर तिने आपले स्थान निर्माण केले,तर दुसरीकडे केवळ समुहापुरत्या व बोलण्यापुरत्या मर्यादित राहिल्यामुळे बोलीभाषा नष्टप्राय होत आहेत ही गंभीर बाब असल्याचे नमूद करुन संस्कृतीचा होणारा -हास, साहित्यिकांची कोंडी, अस्वस्थ वर्तमान ,

संवेदनाहीन समाजाची वाटचाल या संदर्भात त्यांनी आपले चिंतन मांडले . या सत्राच्या अध्यक्षीय समारोपात ॲड. श्री .जे.आर.देवरे यांनी आपल्या बालपणीच्या काही शब्दाची आठवण काढून ते आज बोलले जात नसल्याची खंत व्यक्त केली. शेतीशी संबंधित अनेक शब्द नष्टप्राय झाल्याचेही त्यांनी नमूद केले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. अनिरुध्द मोरे यांनी, तर आभार प्रा. रमेश मेंढे यांनी मानले .

दुपारी एक वाजता पहिल्या सत्राला सुरुवात झाली .या सत्राचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ समीक्षक - विचारवंत डॉ.देवकर्ण मदन हे उपस्थित होते. तर प्रा. डॉ.शशिकांत पाटील ,डॉ.पंडित रानमाळ ,डॉ.गजानन जाधव यांनी निबंधवाचन केले.मराठी भाषा. साहित्य आणि संस्कृती या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण निष्कर्ष मांडून, अहिराणी, बंजारा,मराठवाडी या बोलींच्या संदर्भात काही नोंदी मांडण्यात आल्या.तर बोली या त्या त्या समाजातील सांस्कृतिकतेच्या वारसदार असल्याचे मत व्यक्त करत बोली आणि प्रमाणभाषा यातील सहसंबंध डॉ. देवकर्ण मदन यांनी अध्यक्षीय भाषणात मांडला. या सत्राचे सूत्रसंचालन श्री. सुनील काकडे यांनी तर आभार प्रा. डॉ.शिवचरण गिरी यांनी व्यक्त केले.

दुपारी तीन वाजता दुसऱ्या सत्राला सुरुवात झाली.अध्यक्ष म्हणून प्राचार्य क.दि. भगवान उपस्थित होते,तर डॉ.कैलास इंगळे. डॉ.शिल्पा म्हात्रे. डॉ.उमेश मुंढे.डॉ.दादासाहेब गि-हे यांनी आपले शोधनिबंध वाचले. साहित्य आणि समाज यांना जोडणारी भाषा, लोकभाषा. व्यवहारभाषा, प्रमाणभाषा, साहित्य भाषा, वर्गभाषा अशा भाषांच्या वैविध्यतेचा व बदलाचा आढावा घेण्यात आला.सूत्रसंचालन डॉ.सत्वशीला जाधव यांनी तर आभार डॉ.प्रेमराज जाधव यांनी व्यक्त केले.

या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी अठ्ठावीस अभ्यासक / संशोधकांनी पाठविलेले शोधनिबंध यू.जी.सी.यादीमध्ये समाविष्ट असलेल्या 'रिसर्च जर्नी' या इ-जर्नल मध्ये प्रकाशित करण्यात आले.मराठी भाषा विषयाच्या छत्तीस संशोधक / अभ्यासक / विद्यार्थी यांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदविला.

या चर्चासत्रासाठी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. उत्तमसिंहजी पवार ,सचिव ॲड.जे.आर.देवरे , प्राचार्य डॉ.प्रमोद शर्मा.महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

| | | |
|---|---|---|
| प्रा.डॉ.अनिरुध्द मोरे<br>(संयोजक) | प्रा.रमेश मेंढे<br>(सहसंयोजक) | डॉ.प्रमोद शर्मा<br>(प्राचार्य) |